कि.फौ.अ. क्र. १२१/२०२२.

नि.क्र.०१ खाली.

## तक्रारदाराची शपथेवर पडताळणी.

**नाव** – निळकंठ ≥यंबक ठाकूर.

**वय** – ६२ वर्षे, **व्यवसाय** – सेवानिवृत्त शिक्षक,

**पत्ता** – रा. पिंपळगाव, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर.

**सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

**१.** मी आंतरभारती शिक्षण मंडळ अंतर्गत उत्तूर येथील शाळेतून मुख्याध्यापक पदावरुन सेवानिवृत्त झालो आहे. ती संस्था अनंत विष्णू आजगावकर यांनी स्थापन केली असून मी त्यामध्ये २० वर्षे सेवा केली आहे. मी सेवानिवृत्ती नंतर सदर संस्थेमध्ये ऑगस्ट– २०२१ पासून सचिवाचे काम पाहत आहे.

**२.** मी गैरअर्जदाराला उत्तूर येथील रहिवासी असल्यामुळे ओळखतो. गैरअर्जदाराने दि. २९.०९.२०२१ रोजी दिलेल्या प्रेसनोट मध्ये माझ्या विरोधात बदनामीकारक आरोप केले होते. त्याने माझ्यावरती खोटे आरोप करुन वर्तमानपत्रामध्ये व व्हॉटस्ॲप वरती प्रसारीत केली होती. आरोपीचा व आमच्या संस्थेचा काही संबंध नाही. त्याने मी संस्थेचा सभासद नसून शाळेला फसवून लूट केल्याचे आरोप केले होते.

**३.** त्याने संस्थेचे उपाध्यक्ष सागर देशपांडे यांची देखील बदनामी केली होती. त्यानंतर त्याने दुस–या दिवशीच्या वर्तमानपत्रातून सागर देशपांडे यांची जाहिर माफी मागितली होती. त्याने माझ्याबाबत माफीनामा जाहिर केला नव्हता. गैरअर्जदाराने बदनामीकारक माहिती पिंपळगाव व उत्तूर मधील लोकांच्या व्हॉटस्ॲप वरती पाठवली होती.

**४.** मी त्याबाबत गैरअर्जदाराला वकिलां मार्फत माफी मागण्याबाबत नोटीस पाठविली होती. त्याने मला दिलेल्या नोटीसीला चुकीचे उत्तर पाठविले होते. त्यामुळे मी गैरअर्जदाराला दंडित करण्यासाठी न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

**साक्षीदाराची सही.**

समक्ष,

Digitally signed by
RAVI PANDURANG
THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक –०२.०८.२०२४. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.